म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



# मधुधार

— मा.गो.काटकर

REFBK-0012712
REFBK-0012712

# मधुधारा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38789 वि: ......
क्रमांक ..... नों: दि: 20-12-58

माधव गोविंद काटकर

REFBK-0012712
REFBK-0012712

मूल्य अडीच रुपये

● प्रथमावृत्ति १९६२

● सर्व हक्क लेखकाधीन

● प्रकाशक
**पंडित अनंत कुलकर्णी**
१८६ शनवार, पुणें २.

● मुद्रक
**वि. नी. पटवर्धन,**
साधना प्रेस,
४३०-३१ शनवार, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८९८५ वि: ०१८०
क्रमांक १५०९ नों: दि: २०-१२-८२

मातापित्यांच्या
मंगल स्मृतीस--

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ दारीं येइ वसन्त | १७ | २७ पाचोळा | ४८ |
| २ पिंपळाच्या पारावर | १८ | २८ संध्याकाळीं | ४९ |
| ३ चांदणें घरांत | १९ | २९ कधीं वाटतें | ५० |
| ४ ओल्याचिंब सकाळीं | २० | ३० शिशिर | ५१ |
| ५ हुरहुर | २१ | ३१ एकच रेषा | ५२ |
| ६ तुझें माझें नातें | २२ | ३२ काळा खडक | ५३ |
| ७ तेव्हां ये तूं | २४ | ३३ ग्रीष्म | ५४ |
| ८ वेडा छंद | २६ | ३४ वाट चुकावी | ५५ |
| ९ जीवननृत्य | २७ | ३५ कातरवेळीं | ५६ |
| १० उलटा पिंपळ | २८ | ३६ जाईचें स्वप्न | ५७ |
| ११ नवें-जुनें | २९ | ३७ भक्तीच्या पेठेंत | ५८ |
| १२ वड आणि विहीर | ३० | ३८ जखम | ५९ |
| १३ रस्त्याच्या कडेला | ३२ | ३९ हे बलवंता | ६० |
| १४ पायवाट | ३४ | ४० आला श्रावण | ६२ |
| १५ अशाच वेळीं | ३५ | ४१ लक्ष्मीपूजन | ६३ |
| १६ दीपमनोरा | ३७ | ४२ जास्वंद | ६४ |
| १७ ध्वजगीत | ३८ | ४३ मैफल | ६५ |
| १८ चवथ्या प्रहरीं | ३९ | ४४ कळत नाहीं असें कां होतें ? | ६६ |
| १९ शुभं करोति | ४० | ४५ वाटचाल | ६८ |
| २० सांवळी सांज ये | ४१ | ४६ पहांटवारा | ७० |
| २१ वैशाखाच्या तिसऱ्या प्रहरीं | ४२ | ४७ आलों दूर दूर | ७१ |
| २२ आनंदी यात्री | ४३ | ४८ तमसेच्या तीरावर | ७२ |
| २३ खूण | ४४ | ४९ तेव्हांपासून | ७४ |
| २४ जय सह्यगिरी | ४५ | ५० पाणवठ्याची वाट | ७५ |
| २५ निर्माल्य | ४६ | ५१ दुपार | ७६ |
| २६ रात्र असावी | ४७ | ५२ काळ्या डोहाच्या कांठावर | ७७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३ प्रतीक्षा | ७८ | ६५ किमया | ९० |
| ५४ योजनगंधा | ७९ | ६६ रिकाम्या रानीं | ९१ |
| ५५ वळणावर | ८० | ६७ बकुळीची वाट तुझी | ९३ |
| ५६ शोध | ८१ | ६८ दान दे | ९४ |
| ५७ जागरण | ८२ | ६९ समाधान | ९५ |
| ५८ फुलपांखरूं | ८३ | ७० हेमंत | ९६ |
| ५९ इशारा | ८४ | ७१ मराठी मनांत | ९७ |
| ६० राखणदार | ८५ | ७२ रात्र अतां ढळलेली | ९८ |
| ६१ श्रावणझड | ८६ | ७३ स्मृति | ९९ |
| ६२ साक्षात्कार | ८७ | ७४ मेघदूत | १०० |
| ६३ येइन म्हणते | ८८ | ७५ उघड दार, उघड दार | १०० |
| ६४ दीपवात | ८९ | | |


• • •

* जयजयवन्ती ( १९५१ ) या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहानंतर, गेल्या आठनऊ वर्षांत लिहिलेल्या कवितांतील कांहीं कवितांचा हा संग्रह आहे. माझ्या मनाला या कवितांनीं आनंद दिला तसा तो रसिकांनाहि लाभला तर मला फार समाधान वाटेल.

माझे स्नेही कविवर्य कुसुमाग्रज यांनीं या संग्रहास प्रास्ताविक लिहून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत मला धन्यता वाटते.

या संग्रहांतील बऱ्याच कविता यापूर्वीं सत्यकथा, छंद, नवभारत, सह्याद्रि, प्रतिष्ठान, म. सा. पत्रिका, मनोहर, वाङ्मयशोभा, सुषमा, दीपलक्ष्मी, रोहिणी आदि मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. सर्व संपादकांचा मी आभारी आहें.

'कुलकर्णी ग्रंथागार'चे संचालक मित्रवर्य पंडितराव कुलकर्णी यांच्या प्रेमळ सहकार्यानेंच 'मधुधारा' प्रकाशित होत आहे. त्यांचे आणि प्रेमळ सुहृद् श्री. ग. ना. वर्तक यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

बलिप्रतिपदा
२९-१०-१९६२
५२१ शुक्रवार,
लक्ष्मीनिवास, सोलापूर.

**माधव गोविंद काटकर**

(stamp)

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | १७ | स्थित प्रज्ञावंत | स्थितप्रज्ञावंत |
| १८ | २३ | चालली | चाले |
| २२ | २४ | चकिटा | चकित |
| २५ | १४ | हिरच्या | हिरव्या |
| २५ | २० | व्यामल | श्यामल |
| २५ | २२ | होवुनि | होमुनि |
| २८ | ९ | अड्डवुनी | अडवुनी |
| २९ | ४ | भवंती | भवतीं |
| ३० | ३ | विचारा | बिचारा |
| ६६ | १४ | मिरकील | मिस्कील |
| ७६ | ४ | खुणविती | खुणाविति |
| ८५ | २ | गड | वड |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 92692
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# रसास्वाद घेण्यापूर्वी

१९३६ सालच्या मे महिन्यांतील गोष्ट. मी नाशिक येथें कॉलेजच्या अखेरच्या वर्गांत असतां एके दिवशीं अचानक एक साधारण समवयस्क तरुण मला भेटावयास आला. हा तरुण, कवि आहे तें चटकन् लक्षांत येण्यासारखें होतें. कवींना—स्वजातीयांची ओळख पटावयास उशीर लागत नाहीं. माझा हा अंदाज खोटा ठरला नाहीं. त्यानें स्वतःची माहिती सांगितली. तो सोलापूरचा राहणारा होता. सध्यां पुण्याच्या कॉलेजांत शिक्षण घेत होता आणि कांहीं कामानिमित्त तो नाशिकला आला होता. माझ्या कांहीं कविता त्यानें वाचल्या होत्या आणि त्यांसंबंधीं अनुकूल मत झाल्यानें तो माझा पत्ता काढून मला भेटावयास आला होता. ही सर्व हकीगत ऐकल्यावर कांहीं वेळ मी दिङ्मूढच होऊन गेलों. पुण्यासारख्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन राजधानींत राहणारा एक कवि आपल्या लेखनाविषयीं

आस्था दाखवितो, मुद्दाम शोध काढून भेटायला येतो आणि काव्यसाहित्यादि विषयावर आपल्याशीं बोलूं पाहातो या साऱ्याच गोष्टी सुरस आणि चमत्कारिक होत्या. कवींशीं वा साहित्यिकांशीं कसें बोलायचें असतें, कोणते विषय एकमेकांचा आव राखून हाताळायचे वा टाळायचे असतात या गोष्टीची पक्की माहिती मला न्हती; पण सुदैवाची गोष्ट म्हणजे तो पाहुणा कविहि या संबंधांत माझ्याइतका अनभिज्ञ होता. ही अनभिज्ञता परपस्परांच्या लक्षांत आल्यावर, आम्ही मोकळेपणानें गप्पा मारूं लागलों. संध्याकाळच्या वेळीं गोदावरीच्या तीरावरतीं खूप भटकलों आणि आपलीं मनोगतें एकमेकांना सांगायचा प्रयत्न केला. दोघां सहप्रवाशांची ही अल्पकालीन भेट आम्हां दोघांच्याहि चांगली लक्षांत राहिली आहे. त्या तरुणाचें नांव अर्थात् माधवराव काटकर होतें. प्रारंभींच्या उत्साहभरांत थोडा पत्रव्यवहार झाला; पण तो नेहमींप्रमाणें लवकरच बंद पडला. त्यानंतर खूप वर्षांनीं–सुमारें एक-दीड तपानंतर-आमची पुन्हा भेट झाली. तोंपर्यंत गोदावरीचें किती तरी पाणी वाहून गेलें होतें. माधवराव सोलापूर शहरांतील एका प्रमुख शिक्षण संस्थेचे कार्यकर्ते आणि नाणावलेले शिक्षक झाले होते. त्यांच्या या प्रौढ आणि व्यावहारिक आयुष्यक्रमांत गोदातीरावर भेटलेला तो तरुण भावनाशील कवि कोठें दिसतो आहे का, हें पाहाण्याचा मीं प्रयत्न केला आणि हा प्रयत्न यशस्वीहि झाला. माधवराव शाळेंत चांगले शिक्षक असतील, संस्थेंत कार्यकर्ते असतील, घरांत वत्सल कौटुंबिक असतील, गांवांत नाणावलेले नागरिक असतील; परंतु या सर्व व्यवहारांत त्यांनीं आपल्या कवीच्या भूमिकेचें कटाक्षानें जतन केलें आहे, हें माझ्या ध्यानांत आलें. काव्य हा अपरिपक्क आणि सतत बाल्यावस्थेंत वावरणाऱ्या बुद्धिमत्तेचा एक उद्योग आहे, असें कांही विद्वानांचें मत

अनुक्रम 34185 वि: ...
क्रमांक 1557 नों: दि: 20-12-62

आहे. त्यांच्याशीं भांडत बसायची आवश्यकता नाहीं; परंतु वेगळ्या अर्थानें, कवीच्या ठिकाणीं बालवयांतील कांहीं स्वभावविशेष शिल्लक राहतात व राहावे लागतात, हें मात्र खरें. ज्या दिवशीं कवि हा अंतरबाह्य शंभर टक्के प्रौढ होतो त्या दिवशीं त्याची कवीची भूमिका संपते असें समजावयास हरकत नाहीं. माधवराव काटकरांनीं या भूमिकेचें रक्षण करण्यांत यश मिळविलें आहे.

काटकरांची कविता आज वाचकांसमोर प्रथमतःच येत आहे असें अर्थात् नाहीं. गेलीं कित्येक वर्षें त्यांचीं काव्यें मासिकांदिकांत प्रसिद्ध होत असून संग्रहरूपानेंहि तीं प्रकाशित झालीं आहेत. एक चांगले कवि म्हणून मराठी वाचकांना त्यांचा परिचय झालेला आहे. मी आज त्यांच्या-संबंधीं कांहीं नव्यानें सांगू शकेन, असें मुळींच नाहीं. तसें सांगण्याची खरोखरी आवश्यकताहि नसते. कारण कवीचा वास्तवपरिचय त्याच्या काव्यांतूनच होत असतो. श्री. माधवराव काटकरांची प्रस्तुत कविता गेल्या सात-आठ वर्षांत लिहिलेली आहे. या काळांत मराठी काव्याचें स्वरूप सामान्यतः बरेंच बदललें आहे. किंबहुना कांहीं बदल या काळांत स्थिररूप झाले आहेत. आणि सर्वसाधारपणें काव्याचें पोत त्यामुळें थोडेंसें वेगळें झालें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

श्री. काटकरांची कविता त्यांच्या मनांतील विविध भावना, विविध अनुभव व विविध विचार प्रगट करणारी आहे. त्यांच्या कवितेला विशिष्ट संप्रदायाचें बंधन आहे असेंहि खरोखर वाटत नाहीं. वेगवेगळ्या काळांतील वेग-वेगळे संस्कार तिनें आत्मसात् केलेले आहेत. 'चौथ्या प्रहरीं' 'सांवळी सांज' 'हुरहुर' 'जखम' 'तेव्हांपासून' या व अशा इतर कवितांमधून जुन्या-नव्या संस्कारांचा हा

आकर्षक मिलाफ दिसून येतो. त्यांनीं जुनें सोडलेलें नाहीं व नवीनहि वर्ज्य मानलेलें नाहीं.

श्री. काटकर यांच्या काव्याचें स्वरूप संथ, नितळ आणि कांहींसें नाजूकहि आहे. कल्पकतेचा साजशृंगारहि प्रसन्न आहे. तिचें रूप तिच्या साधेपणांत, अकृत्रिमतेंत आणि सुश्लिष्टतेंतच आहे.

प्रिय व्यक्तीच्या विरहाची भीति पुढील चार ओळींत कशी संयमित परंतु आर्त स्वरांत उमटली आहे, हें पाहण्यासारखें आहे.

आतां अर्ध्या वाटेवर
जाऊं नको परतून
हरवतां मीच, मला—
शोधण्याची तूंच खूण (शोध)

दोन प्रेमिकांमध्यें जेव्हां एकात्मता निर्माण होते, तेव्हां त्यांच्या स्वतंत्र विलग अस्तित्वाच्या रेषा पुसून जातात. ते स्वतःस हरवून बसतात आणि परस्परांच्या अस्तित्वामध्यें शिल्लक राहतात. ही 'खूण' कवीनें अत्यंत सार्थ शब्दांत व्यक्त केली आहे. कवीचें हेंच वैशिष्ट्य पुढील काव्यखंडांतहि प्रत्ययास येतें.

'नीरवतेच्या कुशींत जेव्हां—
पेंगु लागतें अवघें स्थिरचर
तेव्हां ये तूं, मधुस्वप्नासम
शोधाया तव प्रियगीताचें
विस्मरलें जें अमोल ध्रुवपद
माझ्या हृदयीं. (तेव्हां ये तूं)

× × ×

नयनांच्या पाकळ्यांत
रात्रभर गुंतलेलें
स्वप्नाचें फुलपांखरूं
हाय, उडोनिया गेलें! (फुलपांखरूं)

× × ×

स्थिर-अस्थिरतेच्या रेषांची
सरळ वांकडी लांबट नक्षी
निःशब्दपणें टिपूं लागला
अंधाराचा विशाल पक्षी. (संध्याकाळीं)

× × ×

विशाल निळसर घुमटाखालीं
चक्क उजेडीं बसली उघडी
शिशिरामधली ऐन दुपार,
तिला खुणविती घराघरांचे
उघडे डोळे— (दुपार)

कवितेचा आस्वाद तिच्या सलगतेंतून घ्यावयाचा असतो. विलग केलेल्या उताऱ्यांतून तो घेतां येत नाहीं. रसिक मनाला आल्हाद देण्याचें सामर्थ्य कवीच्या लेखणींत कसें व किती आहे हें दर्शविण्यासाठीं वरील ओळी उद्धृत केल्या.

'दुपार' 'तेव्हां ये तूं' 'कातरवेळीं' 'वाट चुकावी' 'येइन म्हणते' 'नवें-जुनें' इत्यादि कविता प्रेम-भावनेच्या मोहक छटांनीं रंगलेल्या आहेत. 'दीपवात' ही छोटी नादमधुर कविता तर मोठी हृद्य आहे.

चांदण्यांत न्हालेली मध्यरात्र
भिरभिरतो फुलवेडा मंद वात
दारिं उभा उन्मादक पारिजात
निद्रावश नीरवता अंगणांत
मंदिरांत जळत शांत बघत वाट
जागतसे कनककांति दीपवात.

कवीची अनुभवकक्षा विशाल आहे. प्रेमाचीं कोमल विलसितें तिच्यांत समाविष्ट आहेत. महाराष्ट्राविषयीं आणि भारताविषयींचा अभिमानहि तिच्यांत व्यक्त झाला आहे. निराकार, अबोध अशी हुरहुरहि तिच्यांत अधूनमधून तरळत आहे; परंतु निसर्गासंबंधींची जाणीव हा या कवितेचा सर्वांत महत्त्वाचा विशेष आहे, असें मला वाटतें. कवीच्या सर्व अनुभवांत निसर्गाचे, त्यांतील छायाप्रकाशाचे, उन्हा-पावसाचे, अंधाराचे, चांदण्याचे, उग्रतेचे व कोमलतेचे धागे गुंफले गेलेले आहेत. सामान्यतः कवीची भावना शब्दांत आकारित होते ती बरोबर हें बहुरंगी सूत्र घेऊनच प्रतीकात्मक नाटकामध्यें समोर वावरणाऱ्या पात्रांच्या मागें अनुकूल रंगांचें व आकृतींचें साहित्य मांडलेलें असतें. तें साहित्य त्या नाट्याचा एक अविभाज्य भाग असतें. काटकरांच्या काव्यांतील निसर्ग अशाच स्वरूपाचा आहे. तो नयनरम्य तर आहेच; पण सचेतन व चेतोहरहि आहे. 'चिरंजीव यात्री' 'स्मृति' 'पायवाट' 'प्रतीक्षा' 'निर्माल्य' 'जीवननृत्य' 'पहाटवारा' 'उलटा पिंपळ' 'पाचोळा' 'काळा खडक' 'हेमंत' 'शिशिर' इत्यादि सरस व सुंदर कविता या विधानाची साक्ष देतील.

काटकरांची कविता एकलेपणानें स्वतःची वाट स्वतःच्या गतीनें चालतां चालतां,

उघड दार, उघड दार
ये छेडित तव सतार
शरद सुखद संगतींत
गाऊं आनंदगीत

असें प्रेमळ आमंत्रण देणारी अशी आहे. माझ्या-सारख्या मित्रांनाच नव्हे तर अपरिचित रसिकांनाहि तिचें हें नितळ, निरागस व अकृत्रिम स्वरूप विलोभनीय वाटेल.

शिवाजीरस्ता
नाशिक

कुसुमाग्रज

# श्री. मा. गो. काटकर यांचें प्रकाशित साहित्य

| | |
|---|---|
| ★ जयजयवन्ती– | ( काव्यसंग्रह ) |
| ★ राजकन्या हेमलता– | ( बालकथा ) |
| ★ रत्नमाला– | ( ,, ) |
| ★ गाणारा पक्षी– | ( ,, ) |
| ★ वनमाळी नि वासंती– | ( ,, ) |
| ★ वनवासी | ( ,, ) |
| ★ रानपांखरें | ( ,, ) |
| ★ सुहासिनी | ( ,, ) |
| ★ मुलांचीं गाणीं | ( बालगीतें ) |

## आगामी

| | |
|---|---|
| ★ आटपाट नगरांत– | ( बालगीतें ) |
| ★ पिंपळपानें | ( बालगीतें ) |
| ★ चौदा रत्नें | ( बालकथा ) |
| ★ एकदां काय झालें | ( ,, ) |
| ★ अलकावती | (काव्यसंग्रह) |



माधव गोविंद काटकर

१ दारीं येइ वसंत

दारीं येइ वसंत
आतां खेद न खंत !
झिजवित कणकण या देहाचा
सुखें साहिला ग्रीष्मकाळचा
वैश्वानरहिं ज्वलंत !
वर्षेच्या धारा शिरिं झेलित
धन्य मानिलें उरीं वाढवित
तृणधान्येंहि अनंत !
शरदाच्या संगति रमतांना
समृद्धीच्या मम स्वप्नांना
चढला हिरवा रंग !
हेमंताची निर्मळ माया
झाली माझी सुवर्ण काया
तेव्हां मी धनवंत !
विस्कटुनि अवघा संसार
शिशिर आज जरि करि संहार
मी स्थित प्रज्ञावंत !

२४-२-'९९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

२

## पिंपळाच्या पारावर –

संध्या येतां, घरोघरीं –
लागे मंद सांजवात
नवलाख रत्नदीप
प्रकाशती आकाशांत
वृद्ध विशाल पिंपळ
उभा भव्य पारावर
संवत्सराची स्मरणी –
ओढी कर्मयोगी थोर
तयाच्या पुढ्यांत एक
सान मूर्ति मनोहर
नंदादीपाचा प्रकाश
पडे तिच्या मुखावर
नित एक रूपवती
भक्तीनें मूर्ति पुजून
घाली संथ प्रदक्षिणा
करी सश्रद्ध वंदन
अंतरीची मुग्ध आर्त
वांछा स्नेहाळ नेत्रांत
स्फुरे ओठाची पाकळी
मूक शब्द सान्निध्यांत
पिंपळाच्या फांदीवर
ओळखीची ये चाहूल
चिमण्या पिलांची चालली
कोटरांत किलबिल
थबकते रूपवती
क्षणभर बघे वर
पुन्हां करी प्रदक्षिणा
पुन्हां करी नमस्कार

७-९-६३

◎ ◎

३

# चांदणें घरांत

चांदणें घरांत चांदणें मनांत
सुस्वर शब्दांचें ओठावरी गीत
तुझाच आरोह
माझा अवरोह
अंतरा दोघांचा एकाच तालांत
चांदणें घरांत चांदणें मनांत
नभीं चंद्रप्रभा
काय तिची शोभा !
माझी चंद्रबाला इथें सदनांत
चांदणें घरांत चांदणें मनांत
रुपेरी धारांत
होउनिया स्नात
स्थिरचर झालें मोहक अद्भुत
चांदणें घरांत चांदणें मनांत
हिरण्यजडित
तृणपर्ण होत
कनक कांतीनें पुष्पें प्रकाशित
चांदणें घरांत चांदणें मनांत
चंद्रकिरणांच्या
मृदु रेशमाच्या
हिंदोळ्यावरती झोंपे आसमंत
चांदणें घरांत चांदणें मनांत
जागतो वृथाच
आपण दोघेंच
धवल चंद्रिका तूं, मी चंद्रकांत
चांदणें घरांत चांदणें मनांत

२१-९-५३

४

## ओलीचिंब सकाळ

जलधारांचा वर्षाव
अनिर्बन्ध अविरत
ओलीचिंब निथळत
सकाळ ये अंगणांत

तिच्या पावलांच्या स्पर्शें
हिरवळ थरारली
तिच्या मृदु करस्पर्शें
फुलवन्ती शहारली

पिंपळाच्या पानांआड
चिवचिव विसांवली
चंचल सान डोळ्यांत
कुतूहलाची सावली

अवचित अन्तर्यामीं
स्फुरे मल्हाराचा स्वर
किनाराया कृष्णमेघ
झेंपावतो वरवर

कितिक दिसांनी आली
वर्षासुंदरी माहेरीं
सुखी माय गंधवती
हर्ष न मावे अन्तरीं

निर्मल जलकणांत
गुंते मन झालें दंग
मनांत जनांत आता
इन्द्रधनुष्याचे रंग

२७-१०-६३

◎ ◎

५

## हुरहुर

जेव्हां असीम व्योमसागराच्या निळ्या जलांत
उफाळून येती निळे शिंपले !
संध्येच्या तरल मादक श्वासाच्या मधुर स्पर्शानें
उमलूं लागतां
सहस्रावधि मोत्यांच्या तेजानें
झगमगूं लागे विशाल सागर !
सर्वस्व अर्पूनी तद्रूप झालेली
आकाशगंगा !
जेव्हां डौलानें मिरवूं लागते
देवस्त्रियांच्या कोमलकरांनीं
कंपित होऊनि उज्ज्वल झालेले
रत्नजडित सुवर्णदीप !
तेव्हां विस्मृतीच्या टेकड्यांवरून
जाणीवेच्या सांद्र मेघावलींतून
स्मृतिविहंग !
निजपंखांची श्रांत फडफड करीत येती
विश्रान्ति घ्यावया
माझ्या मनाच्या मूक कोटरांत !
कोणी कण्हती उसासे टाकीत
कांहींच्या मोकळ्या कंठीं जागी झाली
तृप्तीची लकेर !
मिटूं लागलेल्या त्यांच्या नेत्रपातीं
दंवबिन्दूसम
तरळती माझ्या सुखाचे क्षण दुःखाचे क्षण
विरू लागला त्यांत देहाचा कण नि कण
परि हेहि सुख
मज दीर्घकाळ नाहीं लाभणार !
रात्र संपणार !
पहांट होणार ! !

२५-१०-५३

◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. नं. 92092
स्टॅक

## ६ तुझें माझें नातें

तुझें माझें नातें !
अनंत तारका ग्रह नक्षत्रांनीं जडविलेल्या–
रुपेरी वितानीं–
प्रेमळ चंद्राच्या मादककरांनीं केलें चित्रित !
उषःकालच्या संधिकालच्या
विमल दिशांच्या वदनावरील आरक्त प्रभेंत
त्याचें प्रतिबिंब !
नित्य पाहतो सहस्रकर !

तुझें माझें नातें !
पुळणीवर विहरतांना–
आपुल्या पायांना लाडिकपणें बिलगणाऱ्या
सलील लाटांनीं, केलें कथन धुंद सागरास !
जेव्हां त्याचें उग्र विश्वरुप झालें अतीव शांत !

उंच डोंगर –माथ्यावरूनी–
धवल कृष्ण, नील रक्तवर्ण मेघांचे कंदुक–
लीलेनें झेलित चौफेर फेंकीत–
येणाऱ्या वाऱ्याला आहे परिचित !

तुझें माझें नातें !
त्यानें सांगितलें अल्लड मिस्कील निर्झराच्या कानीं !
त्याक्षणीं त्याची रजतकांति झाली रोमांचित !
रोमांचांतुनी उठे पडसाद !
निनादूं लागला...
जल प्राशनार्थ ओणव्या झालेल्या
चकिटा वेलींच्या पुष्पमंडित कर्णयुगुलांत !
–तोंच पडसाद निनादूं लागला
निबिड अचल वनराईत !

तुझें माझें नातें !
मार्गांत भेटती जे परिचित अतिपरिचित–
अपरिचित लहान थोर !
पुरुष स्त्रिया तशींच बालकें !
सर्व धर्मांची सर्व वर्णांची
आहे त्यांना ज्ञात !
सर्व खल्विदं चराचराला
आपुल्या नात्याची चिर जाणीव !
परि हें नवल !

तुझें माझें नातें–
तुलाहि कळेना, मलाहि कळेना !
कारण एकच–
आपण दोघें दिसतो भिन्न !
आहोंत अभिन्न ! !

११–११–५३

० ०

## ७ तेव्हां ये तूं

नकोस येऊं !
पहांटवारा जेव्हां येइल घेउनी सवें
फार चावरा धीट गारवा !
नकोस येऊं ऐन सकाळीं
दहिवरांतील तव पदचिन्हें
कोमल सुन्दर हाय, परी होतील बोलकीं !
नकोस येऊं मर मध्यान्हीं
प्रखर उन्हांत !
रस्त्यावरले लोचट डोळे उगीच हासत
होतिल मोठे अन् प्रश्नांकित !
नकोस येऊं कधिं सायंतनिं
संधिकालच्या रंगसंगतिंत
उजळुनि येइल
उरांतली तव अधीर धडधड
ती ऐकाया दिशादिशांना फुटतिल कान !
येशिल तेव्हां एकटीच ये !
निळ्या महालांतिल रत्नांचा पडेल जेव्हां
अवतींभवतीं मंद प्रकाश
नीरवतेच्या कुशींत जेव्हां
पेंगू लागतें अवघें स्थिरचर
तेव्हां ये तूं, मधुस्वप्नासम
शोधाया तव प्रियगीताचें
विस्मरलें जें अमोल ध्रुवपद
माझ्या हृदयीं !

१०-७-५४

◎ ◎

८

## वेडा छंद

कोटरांतल्या सान पिलांसम
अजाण मन्मन !

आहे त्याला जगाआगळा म्हणुनि वेडा
एकच छंद !
तरल स्मृतींचीं—
हिरवीं पिवळीं नील तांबडीं शुभ्र नि काळीं
विलोल भिंगें !

कांहीं धूसर नवीन कांहीं कांहीं फुटकीं
तीं एकत्रित करूनि पाहे
अजाण मन्मन सुंदर भीषण
लवचिक दृश्यें !

अदृश्याच्या अरूपतेंतूनि सरूप झालीं
जीं नवदृश्यें !
—हिरव्या रंगांतुनि चमकतें
शकुंतलेचें पत्रांकित लाजरें कमळदळ !

पिंवळ्या भिंगांतुनि भुलविते
मदालसेची रसरसलेली यौवनकांति !
निळ्याच भिंगान्तरीं झळाळे
क्षीराब्धींतिल भगवन्ताचें
सुन्दर श्यामल प्रसन्न दर्शन !

भिंग तांबडें दाखवि जेव्हां—
दाक्षायणिनें स्वतःस होवुनि
घेतां घडला हाहाःकार !
भिंग पांढरें दाखवि क्षणभर
वेदकालच्या मानवतेचें निर्मळ अन्तर

आणिक काळ्या भिंगांत दिसे
प्रलयकाळचा घन अंधार !

मोहक रंगीं रंगुनि मन्मन होत बावरें
कारण त्याला कळतें हें कीं–
रंगहि रंगित भिंगावरला जाइल बदलुनि
उद्यां अचानक !

उद्यां व्हायचीं नवीन भिंगें जुनीं निरर्थक !
अंती उरलीं फुटकीं भिंगें !

त्यांतुनि दिसतें फक्त नभाचें
नितळ निरंजन असीम अन्तर !
तें बघण्याचा जगाआगळा म्हणुनि वेडा
जडे मन्मना एकच छंद !

१४–७–५४

◎ ◎

९

## जीवन नृत्य–

नील वितानी
श्वेत कृष्ण नील मेघांच्या झालरी !

इन्द्रधनुष्याच्या कमानीखालून
नर्तन करीत येऊं लागल्या
श्रावणसरी !

सूर्यकरांच्या स्पर्शानें कंपित
झाल्या उल्हसित
प्रगट करती मणिपुरी थाट एक तालांत !

तृणपात्यांवर वृक्षवेलीवर
जेथें स्थिरावती निमिषभर
त्यांचीं चपळ रुपेरीं पावलें !

उमटूं लागले तेथें सहर्ष
जीवनगीताचे मंथर स्वर !
या अशा वेळीं –
अन्तरांतल्या भिजल्या कोनांत
उभी सलज्ज
एक आठवण !

३०-७-६२

१० उलटा पिंपळ—!

तरंगिणीच्या निर्मळ जलांत
उलटा पिंपळ दंग आपुल्या
रूपचिंतनांत
परंतु त्याची मिस्किल लहर
आहे विलक्षण !
धरू पाहतो अमित करांनीं
कधीं नभाची निश्चल ओलेती
विशाल छाया
चंचल लाटांची अडवुनी वाट
कधीं एखादीच्या सांगतो कानांत
मनांतलें गुज
नित्य पहांटे व्यर्थ धडपडे
धरण्यां बघण्यां निजकरांतुनी
सुटलेले पक्षी
आणि दुपारीं बघे हरखूनी
वाळुकणांनीं विस्कटलेली
शंखशिंपांची सुरेख नक्षी
कधीं विकट हंसतो, पाहुनी
कांठांवरती ओणवलेला
उलटा पांथ
सांजावतें तेव्हां
घनछायेच्या स्पर्शानें त्याला
येतें अंधत्व
होतो पिंपळ उदास व्याकुळ
त्याच क्षणाला त्याच्या भंवतीं
झगमगतें
तेजाळ ताऱ्यांचें
विराट् विश्व !

१-८-५४

## ११ नवें–जुनें

बकुळीच्या मधु सान फुलांनीं
ओसंडे तव कोमल अंजलि
मादक गंधाचीं नव वलयें
दिसती नच परि पसरति भवंती
तुझ्या नि माझ्या—
तुझ्या धुन्द अंतरांत झाली
एक सुवासिक स्मृति उन्मीलित
नेत्रपाकळ्यांवरी आपल्या
पसरुं लागलें तिचें गोड स्मित !
मीहि धुन्द तुझ्यासम परि मज
फुलान्तरांतुनि प्रतीत झालें
नवीन कांहीं जुनेंहि कांहीं !

खोड नि फांद्या,
हिरवीं पिवळीं असंख्य पानें !
कधिं फुलणारीं कधिं सुकणारीं
कळ्या अन् फुलें !
तशींच कच्चीं कांहीं पिकलीं
रसदार फळें ?
आणिक अवचित असहायपणें
गळुनी पडणाऱ्याच फळांतील
मुग्ध अपाप बीज एकटें !

६-८-५४

◎ ◎

## १२ वड आणि विहीर

संध्येच्या जांभळ्या
रंगांत रंगुनी

घुमतो विचारा एकटा पारवा
विहिरी बाहेर
मंद चरणांनीं

येउं लागे कुंद कांटेरी गारवा
निश्चल झालेलें
काळेभोर पाणी

बघाया लागलें चांदण्याचें स्वप्न
बेताल पाकोळ्या
डिवचुनी त्याला

झोंप मोडण्याचें करतात पाप
धुण्याच्या प्रहारें
ओली विकलांग

शिला जगतसे अश्रूंचें जीवन
उदास एकाकी
ऐकत बसली

रातकिड्यांची ती तीच वटवट
मोकळ्या मिठींत
दिवसभराची

लोचट चेंगट नाहीं किरकिर
म्हणुनी आनंदें
मोटेचा चौथरा

पाहतो निवांत लागतो का डोळा

चुकल्या पक्ष्यांची
प्रतीक्षा करीत

कांठावरी उभा वेडसर वड
जांभई देतांना
वाजवी चुटकी

आणि खुडितसे निर्विकारपणें
कितीक दिवस
जतन केलेलीं
आठवणींतलीं नवीं जुनीं पानें

२–९–५४

◎ ◎

## १३ रस्त्याच्या कडेला

रस्त्याच्या कडेला
उभा उपेक्षित इमारतीचा
चिरेबंदी कोन !

कितीक वर्षें
उन्हांत भाजून पाण्यांत भिजून
थंडींत गोठून
आधीच टणक त्याचें सर्वांग
झालेलें आहे निबर ताठर !

कधीं रस्त्यावर
कधीं पायाशीं बिलगलेल्या
मऊ लवचीक हिरवळीवर
रोजची तीच ती गंमतजंमत
टवकारलेल्या कानांनीं ऐकतो
किलकिल्या नेत्रीं सामावून घेतो !

कातर वेळीं
बाबागाडींतील चिमुकल्याच्या
बोबड्या बोलांत रांगू लागणारें
निरागस हास्य !

दोन कातरवेड्या हृदयांची
लुसलुशीत मंद कुजबुज
मोठ्या कष्टानें काठी टेकीत
मागें पहात पुढें चाललेलें
म्हातारपण !

रावांची थाटाची रंकाची कष्टाची
व्यर्थ धावपळ !
—आणि बोलतो स्वतःशीं कोन !

" आज पाहतों मी, काल जें पाहिलें
उद्या इथें कांहीं नसेल निराळें
तरीहि असेंच निश्चल राहून
तेंच तें पुन्हा पाहिलें पाहिजे
जरि कालातीत आणि दशातीत
आहेत माझे जीवनकण !

करूं काय, हाय,
आहे असहाय ! "

२-९-५४

◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38785 ... विभाग ... 
1549 ... 20

१४ पायवाट

रस्त्यासवें भांडुनीया
रुसलेली पायवाट
टेकडीच्या पायथ्याशीं
येऊनी बसे साचेंत

गवताचीं सान पातीं
हळूवार बिलगून
भरल्या डोळ्यांनीं तिचें-
करूं लागतीं सांत्वन

रात्रभर रानवेल
गारठ्यानें झाली त्रस्त
पसरली ऐसपैस
सकाळचें ऊन खात

निळ्या पिवळ्या रंगांचीं
मऊ टोपडीं घालून
बघतीं गोजिरीं फुलें
काळ्या पाषाणाआडून

शुभ्र पांखरांचा थवा
गेला उंच भरारत
निसटलें एक पीस
आलें खालीं तरंगत

त्याच्या रेशमी स्पर्शानें
थरारली पायवाट
मूक रुसवा विरला
उजळलेल्या स्मितांत

लगबगीनें उठली
सोनेरी वस्त्र नेसून
झाडींतील शंकराचें
निघे घ्यावया दर्शन,

११-९-५४

◎ ◎

१५

# अशाच वेळीं

जेव्हां ढळतो माथ्यावरुनी
सप्तर्षींचा शाश्वत प्रश्न !

सुमनांच्या उबदार कुशींतिल
निद्रित परिमळ करण्यां गोळा
हलकें फुलकें दहिंवर घेउनि
ओला वारा थबकत येतो !

दूर क्षितिजावरी टाकते रुपेरि झांजर
पहिलें पाउल !

कोटरांत अन् शाखांवरती
जागृत होते अस्फुट चाहुल
तीन पावलीं त्रिभुवन व्यापित
जेव्हां येतो प्रकाश झळकत
अशाचवेळीं, अक्षरांतुनी-
उमलुं लागती,
नवथर शब्द !

कललेल्या किरणांची किमया
तृणपात्यांतुनि झरझर लोळत
निसटुनि जातां, आल्हादक रंगांत रंगुनी
दिसतें सुंदर अवघे स्थिरचर,
परंतु क्षणभर, तें तदनंतर
होउं लागतें पिंगट धूसर
शिणलेल्या अन् हळव्या हलत्या-
छायांना हळुं खुणावितो सोत्कंठ विसावा

नव्या जुन्या परि मृदु पंखांच्या
अवचित स्पर्शें मिटलीं पानें
पेंगुळलीं तरि कुजबुज करती
प्रकाश कणकण गिळुनी जेव्हां
विराट घन अंधार पसरतो
मोजित चमचमणाऱ्या टिकल्या
अशाच वेळीं,
अक्षरांतुनी उमलुं लागती
नवथर शब्द !

तेव्हां वाटे,
हवें कुणीतरि अगदीं सन्निध
पुष्पदळांसम,
सांगायाला अधीर कानीं
त्या शब्दांचा नवखा अर्थ !

२५-९-५४

◎ ◎

## १६ दीपमनोरा

उत्तुंग मनोरा उभा असे डौलांत
रोंवुनी पावलें काजळल्या खडकांत
पदिं विशाल सागर पसरे, त्याच्यावरतीं
जागता पहारा करितो हा दिनरात.

कृष्णमेघ फोडित चपलेच्या आघातें
कधिं भीषण वादळ गर्जत धांवत येतें
क्रोधानें दर्या कवळु बघे आकाश
परि याच्या पदिं बळ त्यांचें बोंथट होतें

प्रतिरात्रीं उघडुनि प्रखर आपुला डोळा
जरबेंत ठेवतो काळा सागर सगळा
गलबतांस देतो हा गंभीर इशारा
जळिं दडला येथें यमदूतांचा मेळा

रखरखित उन्हांत नि संतत जलधारांत
शिशिराच्या बोंचक तीव्र अशा थंडींत
वज्रदेहधारी, अचल असे निरपेक्ष
स्थितप्रज्ञासम नित तत्पर निज कार्यांत

हो कंपित धरणी वा ढळुं दे अस्मान
हा निर्भय याचें कधींहि न चळें स्थान
चुकलेल्या अगतिक नाविकांस देणार
तेजाळ दृष्टिनें अभयाचें वरदान !

२४-११-५४

◎ ◎

१७

## ध्वजगीत

मंगल राष्ट्रध्वजा, प्रमोदें गाऊं तव जयगान
नवस्फूर्तीचें, संकल्पांचे तूं नित आशास्थान
इंद्रधनूसम मोहक झळके तिरंगि तव रूप
दिव्य तयाच्या प्रभेंत उजळें सकल विश्वरूप
नीलांबरिं तव उन्नत माथा डोलत राहून
सदैव त्रिभुवनिं वाढवि अमुचा वीरोचित मान
चैतन्याचें पावित्र्याचें दे आम्हां वरदान.

कोट्यवधी जनता ही तव पदिं एकत्रित येते
बंधुप्रीतिच्या जयजयकारें नभ कंपित होतें
धैर्य शांतता शौर्यहि श्रद्धा स्वार्थत्यागाचें–
प्रतीक तूं नित मिरविसि भूषण निर्मळ सत्याचें
अशोकचक्र विभूषित अमुचें तूं सर्वस्व महान.

जिथें एकता तिथेंच समता, ममता, निर्भयता
'यत्नदेव व्हा राष्ट्रोन्नतिचा निर्माया गाथा'
नरवीरांच्या कार्यांतुनि हा स्फुरला संदेश
बाणुनि घ्या सकलांच्या जीवनिं हा तव आदेश
तव पद वंदन करुनि घेतलें जनसेवेचें वाण

भारतभूचें सैनिक आम्हीं बलशाली धीट
तुजसह हर्षें तुडवित जाऊं प्रगतीची वाट
प्रेमळ तव छायेंतुनि स्थिरचर उजळित येईल
विश्वशांतिचा प्रसन्न हंसरा रम्य उषःकाल
वैभवशाली जयशाली जय भारतभाग्यनिधान
मंगल राष्ट्रध्वजा प्रमोदें गाऊं तव जयगान

२४-११-५४

◎ ◎

## १८ चवथ्या प्रहरीं

चवथ्या प्रहरीं
वेडी बाभळ माळावरली
लांब करांची करुनी महिरप
धरूं पाहते शिळया उन्हाची
चंचल तिरिप !
परि ती अवखळ, अंग चोरुनी
निसटुनि पळते !
हिरव्या इवल्या तृणांकुरांना
वत्सल सोनेरी हातांनीं
हळु कुरवाळित, चुंबित जाते !
सान थोर पाषाणावरची
तकाकणारी निजरूपाची—
पिवळी कांती गोळा करुनी
वळूनी मागें कधीं न बघते
चपल पाउलें पुढें टाकिते !
आणिक मागें,
हिरमुसलेली बाभळ म्हणते,
आतां येइल माझा जिवलग
घन अंधार
कुशींत त्याच्या शिरतां माझ्या—
दुःखालाहि फुटतिल कांटे,
रुपेरि कांटे !

९-१२-५४

◎ ◎

## १९ शुभंकरोति

निस्तेज होतां
आकाशांतल्या रंगशलाका
मंद पावलीं
गर्द छायांचा येतो घोळका

शिरे कोटरीं
श्रांत झालेली विहंगावली
वारा निर्मितो
पाण्यावरती तरंगावली

देवळांतून
सनई गाते भूप रागांत
दिव्य मांगल्य
पसरूं लागे चराचरांत

दीपकलिका
फुलूं लागती घराघरांत
' शुभं करोति '
मंत्र घुमतो हृन्मंदिरांत

१८-२-५५

◎ ◎

## २० सांवळी सांज ये—

सांवळी सांज ये,
मंद पावलांनीं, नदीकांठावर
संथ पाण्यावर
तरंगु लागली छाया काळसर

अधीर झालेल्या
पंखांच्या झेपेंत आतुरता दाटे
पानीं दडलेला
कलंदर वारा दचकुनि उठे

जलप्राशनार्थ
ओणवीं झालेलीं सान तृणपातीं
शांत डुंबणारी
एखादी चांदणी धराया पाहती

चवथीची कोर
धूसर मेघाला बिलगुनी येते
निष्पर्ण बाभळ
कांटेरी वांकडे हात उंचावते

श्रांत पाणवठा
पाऊलवाटेच्या कानीं कुजबुजे
" आतां जागूं नको
उद्यां पुन्हां उरीं घ्यावयाचें ओझें ! "

१०-३-५५

◎ ◎

## २१ वैशाखाचा तिसरा प्रहर

वैशाखाचा
जळतो कणकण तिसरा प्रहर
अवतीं भवतीं
फुलतो दाहक खदिरांगार

फिरतो वणवण
उधाणलेला पिसाट वारा
घरीं नि दारीं
कुठें न लाभे त्यांस निवारा

तृणपर्णांची
म्लान जाहली हिरवी कांती
तृषार्त पक्षी
वृक्षांच्या मृदु कुशींत बसतीं

गगन पेटलें
आग पसरली दिशादिशांतुन
धगींत धरणी
तडकुनि कण्हते व्याकुळ होउन

अवघें स्थिरचर
अग्निदिव्य करि असह्य दारुण
उरिं वर्षेचें
जीवनदायक नामस्मरण

९-३-५५

◎ ◎

२२

## आनंदीयात्री

आम्हीं नवथर तृणपातीं
वत्सल सुंदर अमुची माता, आहे ही धरती

उंच-गिरीवर खोल दरींतुन
उपवनिं माळावर शेतांतुन
गजबजलेली अवतींभवतीं अमुची नित वसती

विशाल निळसर घुमटाखालीं—
बसुनी, वाऱ्याच्या हिंदोळीं—
गातांना थरथरते अमुची पाचूची कांती

सरतां नक्षत्रांकित रात
प्रकाश पसरित येइ प्रभात
तेजस्वी मोत्यांची शिंपण, करि आम्हांवरती

गुरें वासरें मानव वनचर
यांचें जीवन करणें सुखकर
या ध्येयास्तव आत्मसमर्पण ही अमुची नीती

तुमच्या पायांतळिं नित राहुन
निशिदिनिं होतों आम्हीं पावन
रम्य उद्यांच्या विश्वीं तुमची वाढू द्या कीर्ती

निर्बल नच वा दीन निराश्रित
विश्व असें हें अमुच्या अंकित
सृष्टिदेविचे आम्हीं आहों आनंदीयात्री

१–५–५५

२३

## खूण

रंगलास कधीं
आरक्त उषेच्या रंगसंगतींत !

हिंडलास कधीं
निशेच्या नीरव गूढ शांततेंत !

न्हालास कधीं
शांत चंद्रिकेच्या धवलकांतींत !

विरलास कधीं
तारामंडित नभाच्या दीप्तींत !

पाहिलीस कधीं
उल्केची ज्वलंत चपल गती !
आहे का प्रचीति !

असेल तर,
माझें अस्तित्व
तुझ्या अस्तित्वाची
एकच खूण !

९-५-५५

## २४ जय सह्यगिरी—

जय सह्यगिरी, जय यशोगिरी, जय स्वातंत्र्यनिधान
महाकाय विस्तीर्ण सुशोभित
विशाल कृष्णकड्यांनीं वेष्टित
उन्नत तव माथा भेदाया बघतो नीलवितान

महाशक्तिसह नित परमेश
तव शिखरांवरि करि अधिवास
निर्झर, सरिता पर्णासनिं द्विज, गाती तव स्तुतिगान

सांवलींत तव, हिरवें कोंकण
फुललें जणुं सुंदर नंदनवन
तव पदिं पसरे देश प्रतापी, वाढवि तव सन्मान

छत्रपतींच्या पराक्रमाचा
स्वातंत्र्याच्या संग्रामाचा—
घडतों साक्षात्कार पाहुनी दुर्गम दुर्ग महान

तव दर्शनिं लाभें संजीवन
स्वतंत्र बाणा स्वतंत्र जीवन
कृपाप्रसादें तुझ्या फडकलें अटकेवरति निशाण

पुण्यभूमि ही संतकुळांची
कर्मभूमि ही नरवीरांची
शौर्य, धैर्य, श्रम, त्याग, एकता यांचें दे वरदान

१४–५–५५

२५

## निर्माल्य

प्रभातकालीं
जागृत झाल्या वृक्षवेलींवर
झोंपलेल्या कळया !
वायुलहरीच्या कंपित स्पर्शानें
एकेक पाकळी सान मखमली
उमलूं लागली
आणिक कोंवळ्या पिवळ्या उन्हांत
डोलूं लागलीं फुलेंच फुलें !
उरीं दडलेल्या मोहक गंधानें
होऊनी धुंद
पानांची पोपटी कांति बघण्यांत
आहेत दंग !
ह्यांच्या शेजारीं काल खुडलेल्या
फुलांच्या शुष्क काळवंडलेल्या
आहेत डहाळ्या !

आजहि येणार फुलमाळ्याची
काळी सांवली
घरांत दारांत, निर्माया निर्माल्य !

१५-५-५५

◎ ◎

## २६ रात्र असावी—

रात्र असावी,
परि नुसता अंधार नसावा
कोर नसावी
परि पुनवेचा चंद्र असावा

गजबजलेल्या,
मार्गाची संगती नसावी
तृणपात्यांची
हिरवी मखमलि वाट असावी

झोंबुनि जावी
वाऱ्याची गति अशी नसावी
हळुंच बिलगुनी
सुख देणारी झुळुक असावी

रातकिड्यांची
उगाच किरकिर फार नसावी
दिशादिशान्तरि
अबोध नीरव शांति असावी

माथ्यांवरती
गर्दी नक्षत्रांचि नसावी
समोर एकच
शुक्राची चांदणी असावी !

२९-५-५५

## २७ पाचोळा

शरद चांदणें तृणपर्णांवर
ठिबकत ठिबकत
झालें ओलें !

फुलाफुलांतिल मधुगंधानें—
येते निथळत, येते थबकत
झुळूक मंथर
नवयुवतीसम.
इथें तिथें शोधिते हाय, जें
विस्मरलेलें संकेतस्थल !

जवळुनि जाणारी एकाकी
रूपेरि लवचिक पाउलवाट
बघुनी, सळसळतो पाचोळा
झाडाखालीं अंधारांत !

३१-७-५५

◎ ◎

२८

## संध्याकाळीं—

धूसर डोंगर माथ्यावरतीं—
बसुनी, तिरपी शशिची कोर
जवळच बघते खुणाविणारी
एक चांदणी रम्य टपोर

दिशादिशांतुनि उतरूं लागला
गहन कृष्ण छायांचा मेळा
झाडांच्या उबदार कुशींत
होऊं लागली किलबिल गोळा

कधींच गेली क्षितिजामागें
संथपणें मेघांची रांग
पुसुनी अपुल्या अंगावरला
गर्द गुलाली गहिरा रंग

स्थिर अस्थिरतेच्या रेषांची
सरळ वांकडी लांबट नक्षी
निःशब्दपणें टिपूं लागला
अंधाराचा विशाल पक्षी !

५–८–५५

० ०

२९

## कधीं वाटतें—

निवान्त माझ्या नितळ मनांत
लाल फुलांची घेउनि ओंजळ
हळूच बघतो कधिं गुलमोहर !
सुवर्ण चांफ्याचीहि मुलायम
गंधित कान्ती गुंतुनि बसते
कधिं नेत्रांत !
कधिं रेशमी सळसळ थबकत
अधीर कानीं
शिरते अलगद !
कधीं वाटतें
पुरूरवा कां उर्वशीवरी
झाला मोहित !
झाला वंचित ! !

२-९-५५

० ०

३०

# शिशिर

थंडीच्या कांटेरि मिठींतुन
निसटुनि धांवे धुकें पांघरुनि
बोंचक वारा !
कंपित करि तृण पर्ण फुलांना
तरंगिणीच्या कंठीं घाली
धवल फेनपुष्पांच्या माळा.
फुंकर घालुनि बघतो, अवखळ
कसें शहारें उघडें अंग !

वर्षाकालीं,
कुशींत जपलेल्या बीजांतुनि
हिरव्या झालेल्या भूमीवर
गर्भवतीसम, चढूं लागली
पुनवेच्या चंद्राची कांती !
अनिमिष बघतो निशिदिनिं उजळुनि
आकाशाचा निरभ्र निळसर
विशाल डोळा !

४-९-५८

दा. क्र. 9209

## ३१ एकच रेषा

एकच रेषा
बारिक लवचिक उभी आडवी
सरळ वाकडी गोलाकार !
जिथून निघते तिथेंच येते
मिसळुनि जाते.

रंगांच्या तेजानें नाहुन
फिरूं लागतो संथ कुंचला
रेषांमधलें अंतर भिजवित
अंतर उजळित
आणि प्रकटते
दृष्टिसमोर
मोहविणाऱ्या
मदालसेची मादक प्रतिमा !

१४-९-५५

◎ ◎

## ३२ काळा खडक

काळा खडक
कोंवळीं पोपटीं गवतांचीं पातीं
बाजूस सारून, नित्य बघतों
धूसरवेळीं, गोऱ्या पायांनीं
उमटलेलीं काळीं पावलें
मळलेलीं वाट एकटी सोडून
संथ प्रवेशती शेजारच्या गर्द
मुक्या झाडींत !

—आणि तिथून, अंग चोरून
आलेला वारा
काळ्या खडकाच्या कानीं कुजबुजे,
' पाहिलीस कधीं,
शकुंतलेची
दुष्यंत-भेट ! '

२९-१२-५५

○ ○

## ३३ ग्रीष्म

दाहक अंगार पेरीत चौफेर
आला, आला ग्रीष्म !
त्याचें उग्रतेज बघवत नाहीं
साहवत नाहीं.
तृणपर्णांची झाली म्लान कांती,
सुकल्या कळ्या, गळूं लागले
फुलांचे पंख !

उन्हाच्या आगीनें जळणारा वारा
पिसाट होऊन, घरांत शिरून
देतो चटके !
होते तगमग,
पाणी, पाणी, पाणी. . .
कुठलें पाणी !
खारट पाणी,
घर्मबिन्दूंचें आणि आंसवांचें !

तडकूं लागली, काळवंडलेली
धरतीमाता
आटूं लागलें तिच्या कुशींतलें
प्रवाही जीवन !
वृक्षांवरती दग्ध पानांच्या
विरल छायेंत, उघड्या चोंची
होतात व्याकुळ !

पेंगुळलेल्या तृषार्त जीवांचे
अधीर डोळे न्याहाळती, व्यर्थ
पेटलेलें नभ आणि शुष्क ओठीं
उमटे कोरडी करुण वाणी
पाणी, पाणी, पाणी !
कुठलें पाणी !
हन्त, आहे वर्षा गर्भवासांत !

९–४–५६

◎ ◎

३४ वाट चुकावी–

संध्यारंजित मंद प्रकाशीं
वाट चुकावी.

उगाच रेंगाळत फिरतांना
तुझी भेट अन् अचूक व्हावी !

संध्यारंगांतून स्मिताची—
चंद्रकोर हळुं उमटुन यावी
शब्दाशब्दांना बसलेली
अवचित मग निरगांठ सुटावी !

११ ४-५६

० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 34985 दि: ...
क्रमांक 1543 नों: दि: 20-12-82

## ३५ कातरवेळीं

कातरवेळीं, तुला पाहतां,
स्मृतिच्या कांठीं आलें उमलुन
शैशवांतले सोनेरी दिन!

लपंडाव अन् सागरगोट्या
चित्र श्रावणीं फुगडी झिम्मा
गौर करांवर लालट मेंदी
हस्तामधला हदगा फेर
'उठा उठा राणी, चला घराला'
आणिक स्मरलीं,
नदीकांठचीं आंबट बोरें!

तीच काय ही असेल अवखळ!
भांग मधोमध, गहिरे डोळे
सरळ नासिका, जिवणीच्यावर
हिरवा तीळ!
अवचित हसुनी म्हणालीस तूं,
"ओळखिलें मीं तुम्हांस, तुम्हीं—
विसरलांत का नदीकांठचीं
आंबट बोरें!"
हसलों मीही, लपवित व्यर्थ
त्या हंसण्यांतिल परका अर्थ!

१३–४–५६

◎ ◎

## ३६ जाईचें स्वप्न

जाई सांगते जुईच्या कानांत
" ऐक माझें स्वप्न ! "
गौर करानें खुडल्या माझ्या
चिमण्या कळ्या, मिरवूं लागल्या—
डौलांत काळ्या कुरळ्या केसांत
जशा दिसती गहन रात्रीं
गहिऱ्या चांदण्या !

—आणि पहांटे,
' शुभ रजनीच्या ' शुभ्र उशीवर
विखुरले ग कोमेजलेले
कळ्यांचे पंख !
काय या स्वप्नाचा
असावा ग अर्थ !

जुई म्हणाली,
कसला अर्थ, सगळा स्वार्थ,
आपुलें सुंदर
गंधित यौवन
आहे शापित !
स्वप्न हें सत्य
सत्य हें स्वप्न !

२७-४-'५६

◎ ◎

३७

## भक्तीच्या पेठेंत

भक्तीच्या पेठेंत
वैष्णवांचा मेळा
भजनीं रंगला
वाळवंटीं

निवान्त राऊळीं
सांवळा विठ्ठल
होवोनी व्याकुळ
बोलतसे

' युगें अठ्ठावीस
एका विटेवर
कटीवरी कर
ठेवोनीया

अवघडलेला
देह सावरून
दुखती चरण
रात्रंदिन

आतां माझ्यास्तव
देणार आणून
दुजी वीट कोण
पुंडलीक !—

२३-९-५८

◎ ◎

३८

# जखम

मूक मनांतिल
अंधाराला
तव शब्दानें आला उजळा
एक अनामिक
मधु स्वप्नांत
अर्थ वेगळा भरूं लागला

अवचित तेव्हां
होउं नये परि-
होउनि जागृत स्मृति चुकचुकते
अशाच फसव्या
शब्दशराची
जखम उरांतिल अजून दुखते

२०-७-५६

◎ ◎

३९ हे बलवन्ता

घनांधकारीं महाराष्ट्र हा
झाला जेव्हां अबल अचेतन
तूंच घातलें त्याच्या ओठीं
दिव्य प्रकाशाचें संजीवन

सह्याद्रीसम वज्रदेह तव
विशाल छाती ताठर कणखर
शांत निग्रही ओठांमधुनी
'स्वराज्य' मंत्राचा स्फुरला स्वर

त्या मंत्राच्या दाहक तेजें
असंख्य हृदयांच्या कोनांत
लखलखणारी धगधगणारी
जळू लागली ज्वलंत ज्योत

गभीर वाणी होती तव जणुं—
पाशुपताची अनलज्वाला
तळपत तडिते परी निघाली
अन्यायाला गिळावयाला

ओजस्वी तव वाणी परिसुन
सुप्त मातिच्या कणाकणांतुन
प्रकट जाहली, नच गवताचीं
परि खड्गांचीं पातीं भीषण

सिंहगर्जनेनें दुमदुमली
भारतभू आसेतुहिमाचल
दाही दिग्गजही थरथरले
झालें कंपित सकल महीतल

कसें म्हणावें तुला वेगळें
नव्हतें काधिं तव जीवन भिन्न
कोटि कोटि जनहृदयराउळीं
तुझेंच दर्शन, तुझेंच पूजन

अढळ ध्रुवासम तूं मृत्युंजय
प्रकाश प्रभुवर हे बलवंता
युगायुगांतिल नव मानवता
गर्जत राहिल तव जयगाथा !

२४-७-५६

## ४० आला श्रावण

आला श्रावण
भिजवित अंगण
हिंदोळ्यावरि झुलूं लागलें
उल्हासानें प्रमत्त यौवन

झिम्मा फुगडी खेळ खेळतां
नवरंगांचा गोफहि विणितां
कनककांतिच्या करिं नवकंकण
करूं लागलें मंजुळ किणकिण

गौरकरांवर चपल पदांवर
लालट मेंदी खुलते सुंदर
बघते टकमक अवखळ हिरवळ
झिमझिम जलधारांनीं न्हाऊन

फुलाफुलांतिल सुगंध उधळित
झुळूक मंथर येते थबकत
भारी मिस्किल जाइजुईच्या
कळया फुलविते फुंकर घालुन

आनंदानें उतट होउनी
सांगे श्रावण घराघरांतुनि
' आटपाट नगरीं ' घडलेली
गोड कहाणी सुंदर नूतन
आला श्रावण
भिजवित अंगण

१–८–५६

◎ ◎

४१

## लक्ष्मी-पूजन

श्रीफलतोरण दारावरतीं
सनई गाते सप्तसुरांत
भवतीं गर्दी तरीहि मांडव
दंग होउनी बसला ऐकत

पाहुं लागले डोळे चार
स्वस्तिक अंतरपाटावरलें
कुंकुम रंगीं रंगुनि उजळुनि
स्वप्न सुखाचें समूर्त झालें

लाजाहोमांतल्या धुरांतुनि
कोंपऱ्यातलें नवें बोहलें
गोऱ्या पायांची सप्तपदी
निश्चलतेनें बघूं लागलें

रूपवतींच्या मेळाव्यांतुनि
मधु हास्याची लकेर येते
लाजवंतिच्या अधरदळांतुनि
गोड उखाणा लाजत उमटे

सभोंवतीची निरखित धांदल
निवांत बसलेला गौरीहर
नत गौरीच्या गौरकरानें
आंबा शिंपुनि घे अंगावर

चंद्रज्योतिच्या मंदप्रकाशीं
बिलोरि दर्पण बघतो वाकून
चंद्रकलेसम सुंदर सुनमुख
कशी पाहते विहीण हरखुन

उंबरठ्यावरि उभा राहुन
माप रुपेरी अधीर होउन
म्हणतें, ' आतां मी होणार
लक्ष्मीच्या चरणानें पावन ! '

२४–८–५६

◎ ◎

४२

## जास्वंद

गहिरें गाणें कधींच सरलें
अजूनि रुतले
कुंद हवेच्या मिठींत मंथर
ढंगदार रागिणिचें सु-स्वर !

पुसून गेलीं तीं पदचिन्हें कधींच-
तरिही, झाडाच्या पायास लपेटुनि
अजून बसली पाउलवाट !

कधींच गेला वसंत
परिही अजून फुलते
मनांतली हळवी जास्वंद !

३-९-५६

○ ○

४३

## मैफल

मस्त रंगली रात्रीं मैफल
थकुनी आतां रुपेरि पैंजण
मंचकावरी झोंपी गेले
गोऱ्या पायावरतीं रेलुन

लहान मोठे लोड नि तक्के
निळ्या भिंतिच्या पाठीवरतीं
कांहीं तिरकस होउनि, कांहीं-
बसल्या जागीं शांत पेंगती

तंबोऱ्याच्या भिठींत निद्रित
निमूट झालेली सारंगी
घुमवुनि घुमवुनि ताल केरवा
तबल्यालाही आली गुंगी

गालिच्यावरी रितें एकटें
चांदीचें पानदान बसलें
स्मरूं लागलें, किती जणांच्या
ओठावरतीं विडे रंगले

खऱ्या कलेची फुटकी किंमत
हिरव्या नोटा रजत मुखवटे
विचार करिती, उद्यां कुणाच्या
हातीं अपुलें नशीब खोटें

कधींच गेले ठुंबरिचे स्वर
वाऱ्याच्या पंखावरि बसुनी
सरली मैफल केवळ उरली
रसरंगाची मूक निशाणी

३-१०-५६

◎ ◎

## ४४ कळत नाहीं असें कां होतें !

कळत नाहीं असें कां होतें !
अक्षरांतून शब्द फुलत नाहींत
फुललेंच तर—
शब्दांचीं वाक्यें जुळत नाहींत
जुळलींच तर—
साधींहि वाक्यें होतीं प्रश्नांकित
गोंधळलेलें मन उद्गारतें,
कळत नाहीं असें कां होतें !

परिचित कोणी मार्गांत भेटतो
हवापाण्याच्या गोष्टी बोलतो
सांगण्यासारखें सांगत नाहीं
ऐकण्यासारखें ऐकत नाहीं
हातचा एक राखून ठेवतो
मिस्कील हंसून पाठमोरा होतो
आपलेंच कांहीं चुकलें वाटतें
कळत नाहीं असें कां होतें !

सोपा हिशोब जमत नाहीं
खट्याळ आंकडा सांपडत नाहीं
सगळी बेरीज उण्यांत बुडते
गुणिलें चिन्ह भागत सुटतें
निव्वळ उणी बाकी राहते
कळत नाहीं असें कां होतें !

तीच तीच वाट पायांत घोळते
म्हणते कशीं, जातोस कुठें !'
पुढचें पाऊल माघारीं येतें

मागचें पाऊल जागींच खिळतें
तेव्हां मनाचा होतो चक्रव्यूह
आंत शिराया अभिमन्यूंची
रांग लागते,
कळत नाहीं असें कां होतें !

तुम्हांला अशी जाणीव होते का !
कळत नाहीं तें कधीं कळतें का !
सत्याची कट्यार दुधारी असते
कशाला सांगता मज आकळतें
रंगीबेरंगी जरी मुखवटे
एकच आहे आपुलें नातें
तरीहि...तरीहि...
कळत नाहीं असें कां होतें !

६-१०-५६

◎ ◎

४५

## वाटचाल

रात्र असे अंधारी
वळणांची वाट असे
वाटेवर काय पुढें
डोळ्यांना मुळिं न दिसे
चुकलेल्या पक्ष्यांचा
कानीं ये आर्तस्वर
अविरत घुमते भवतीं
रातकिड्यांची किरकिर
शिणले पद परि कोठें
थांबाया वेळ नसे
पुढें पुढें जाण्याचें
जडलें जीवास पिसें
सुटलेला तीर कधीं
परतुनि का येणार !
सरितेचा ओघ कधीं
मागें का फिरणार !
कोसळुं दे जलधारा
वर्षूं दे अंगार
काळोखाची न तमा
मी पुढतीं जाणार
लाटा फोडूनि बळें
सागर तळिंचे मोतीं
वेंचुनिया घेण्याची
आहे बेडर छाती
अंतरांत तेवतसे
एक स्निग्ध दीपज्योत

या ज्योतिनें लाविन
ज्योति लक्ष अंतरांत
वाटचाल माझी ही
चालणार रात्रंदिन
जळुनि जगा उजळावें
हें ज्योतीचें जीवन

८-१२-५६

◎ ◎

४६

# पहांटवारा

पहांटवारा करी गुदगुल्या
हंसता हंसता अंग घुसळुनी
कुळवंताची पोर, जुईची–
विस्कटलेली सुटली वेणी
खुदकन् हंसली आणिक झाली
पिवळी शेवंती रोमांचित
ताठ उभा राहुनि निशिगंध
बघतो टकमक सारी गंमत
वांकुनि बघणारी जास्वंद
लाजलाजुनी झाली लाल
म्हणें, ' मलाही असाच छळतो
सांज सकाळीं हाच चहाटळ ! '
माणिकमोत्यांचें मधुहास्य
प्राजक्ताच्या मुखावरि फुटे
रागानें आरक्त होउंनी
गुलाब बसतो मोजित कांटे !

२१–८–५७

◎ ◎

४७

# आलों दूर दूर

आलों दूरदूर संगें
रखरखत्या उन्हांत
कधीं पावसाच्या धारा
अंगावरतीं झेलीत

कधीं रम्य चांदण्यांत
कधीं घन अंधारांत
सुखदुःखाच्या क्षणांची
झाली होती पायवाट

आतां अर्ध्या वाटेवर
जाऊं नको परतून
हरवतां मीच, मला
शोधण्याची तूंच खूण !

२४-८-५७

◎ ◎

४८

## तमसेच्या तीरावर

रथ फिरवुनि वेगानें
निघुनी गेला लक्ष्मण
तमसेच्या तीरावर
सीतेचें आक्रंदन

तें ऐकुनि शोकाकुल
वृक्ष लता पक्षीगण
वसुधाही द्रवली अन्
पाझरले पाषाण

भूनंदिनि, काय तुझ्या
त्याग प्रीति निष्ठेचें
हेंच असें फळ, असेंच–
जीवन स्त्रीजातीचें !

रजकाच्या शब्दांचा
झाला रघुराज दास
पुनरपि ये तव भाळीं
दुःखाचा वनवास

कुत्सित उन्मत्त शब्द
हाय, प्रभावी ठरले
दारुण तव अग्निदिव्य
अंतीं लटकें झालें

देवी तूं, तव स्पर्शें
झाला पावक पावन
तुज त्यागुनि अपराधी
रामासह अवघे जन

अजुन येतसे कानीं
सीते, तव आक्रंदन
वाल्मिकिनें रचिलें परि–
सरलें नच रामायण

७-९-५७

◎ ◎

४९

# तेव्हांपासुन

गेला तो क्षण,
तेव्हांपासुन, आहे हिरवी
एक आठवण!

भल्या पहाटे,
फुलाफुलांच्या, मखमलीवरी
दवांत भिजते!

ऐन दुपारीं
उन्हांत उलते, सुकते, जळते!

तिन्हीसांजची,
स्वतःस हरवुनि, शोधित बसते!
निवान्त रात्रीं
अंधाराच्या कुशींत कण्हते!

अजून हिरवी, तीच आठवण
गेला तो क्षण,
तेव्हांपासुन!

१०-९-५७

◎ ◎

## ५० पाणवठ्याची वाट

लहान मोठ्या उलट्या सुलट्या
कोमल राकट पदचिन्हांनीं
पाणवठ्याची मळते वाट !

इथें पावलांवरी पावलें,
कृतज्ञतेचीं कृतघ्नतेचीं
जशी रोखीची, तशी वायद्याची
भरल्या पोटांची, उपासमारीची.

कालच्या शिळया पाऊलखुणा
पुसूनि टाकिती आजचीं पावलें
आणि उद्यां !...

भेदांत अभेद
मानिते झिजते मळलेली वाट.
सर्वांना लाभावी
निर्मळ पवित्र जीवनगंगा
म्हणुनी तिनें निज देहाची
केली पायघडी !

विरागी वाट
हीच तिची भक्ति
हीच तिची मुक्ति !

२४-१०-५७

◎ ◎

५१

# दुपार

विशाल निळसर घुमटाखालीं
चक्क उजेडीं बसली उघडी
शिशिरामधलीं ऐन दुपार !

तिला खुणविति घराघरांचे
उघडे डोळे !
झाडांच्या तर बनल्या छाया
अधीर झाल्या तिज स्पर्शाया

शीतल वारा हळुच चावरी
फुंकर घालुनि तिच्या मुलायम
अंगांगावर फुलवी कांटे !

मख्ख दुपार,
अवतींभवतीं पाहत नव्हती
ऐकत होती,
‘ प्रियंवदे ग, रुतला माझ्या
पादिं दर्भांकुर ’

२४-१०-५७

◎ ◎

## ५२ काळ्या डोहाच्या कांठावर

काळ्या डोहाच्या कांठावर
असे वडाचा वृक्ष पुरातन
वृद्ध तपस्वी जटा लोंबती
सुरकुतलेला देह लपेटुन

पहांट किलबिल करीत जाते
उन्हांत उघडी दुपार बसते
निर्विकार या योग्याची परि
घोर तपस्या कधीं न ढळते

वेळुवनांतिल कर्कश शीळ
कानीं येतां संध्याकाळीं
एकच डोळ्यांमधें वडाच्या
विशाल होते लाल बाहुली

काळ्या डोहाच्या पाण्यावर
काळें जाळें अलगद पडतें
जलांत ओली उभी मेनका
विश्वामित्राची मति चळते,

३१-१०-५७

◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 38989 ...... वि: ......
क्रमांक ... 2529 ......... नों: दि: ......

५३

## प्रतीक्षा

सूर होउंनी मधुर बांसरी
फिरूं लागली चोंहिकडे
तालबद्ध होउनि नुपुरांचीं
पडति पावलें पुढें पुढें

हिरवळ झाली रोमांचित अन्
अर्धस्फुट कलिका उमले
वसन सळसळे कंकण ध्वनिंतुन
अधीर ओठीं गीत फुलें

कदंब वृक्षातळीं येउनी
झाली उत्कंठित वाट
कुंजामागें श्रीरंगाच्या
खुलें चांदणें नयनांत

नूपुर झाले मूक; बांसरी
एक शब्दही बोलेना
वाट पाहत्ते कालिंदी परि-
घडा रिकामा भरेचना !

१०-१-५८

◎ ◎

५४ योजनगंधा

परादराच्या वरदानाविण
होउनि योजनगंधा
फुलवेडी रात्र, आली, आली...
उमलवीत उन्मादक
नीरव गंधविश्व

अशाच समयीं
मी व्हावें यक्षगीत
तूं...
तूं तर आहेस निरंतर
ज्याचें ध्रुवपद !

४-२-५८

◎ ◎

५९

# वळणावर

हिरवीं नवतृणपातीं
गर्द निळी जलवंती
कांठावर ओलेती
वासंतिक भर दुपार, गंधवती !

कोकिळ कूजन ऐकत
जलदर्पणिं बघत म्हणे
लागावी दृष्ट अशी
आहे मम अंगकांति !

हेंच मनीं जपत निघे
सुकलेलें सोनसळें
पायघोळ वसन नवें
सांवरीत सांवरीत
टाकित पद मंद मंद !

वळणावर,
जांभुळक्या डोंगरास
क्षण बिलगुनि हंसुनि म्हणे,
'थांब इथें, यावेळीं याच स्थळीं
खचित उद्यां मी येइन,
मी येइन !'

८-२-५८

◎ ◎

५६

## शोध

चांदण्यांत हरवली
एक टपोर चांदणी
कुठें शोधूं, चढ्लं लागे
आकाशगंगेला पाणी !

गर्द कुंजांत लपली
एक फुलवेडी राणी
हाय, कुंजानें घातली
गगनाला गवसणी !

शोधीत पाऊलवाट
आलों फार दूरदूर
मृगजळाच्या नदीला
आला अवचित पूर !

६-४-५८

◎ ◎

५७

# जागरण

गर्द काळाशार, बाहेर अंधार
कधींच झालें बंद प्रकाशाचें दार!

पेंगुळलीं झाडें, पेंगुळले वाडे
पेंगुळलेल्या देहांत मन अवघडलेलें,
अवघडलेल्या मनांत,
अवघडलेली तूं
अजून उभी आहेस!
बसत नाहींस, बोलत नाहींस
जात नाहींस
जागवितेस, जागत बसतेस!

अशा जागरणाला
लाल डोळ्यांची
पहांट हंसते!

२८-२-५८

५८

## फुलपांखरूं

रात्र घेऊनीया गेली
लाख रत्नांची दौलत
धुक्यांत न्हाऊन आली
क्षितिजावर पहांट

तृणपर्णांवर काढी
दंवाची सुंदर नक्षी
झाडांतून भरारती
निळसर नभीं पक्षी

आतां निवांत झोंपली
गंधवती रातराणी
हिरव्या शय्येवरती
जागी झाली फुलराणी

नयनांच्या पाकळ्यांत
रात्रभर गुंतलेलें
स्वप्नांचें फुलपांखरू
हाय, उडोनीया गेलें

५-३-५८

◎ ◎

५९

## इशारा

शुभ्र चांदणें सभोंतीं
पानाफुलांवर चढे
तलम रुपेरी कांती

टाक जपून पावलें
लपलेल्या अंधाराला
फुटतील लाख डोळे

बहरला पारिजात
दरवळतो सुवास
तुझ्या मदिर मनांत

ओठांत गीतविलास
अनर्घ्य रूपसंपदा
घेऊन तूं निघालीस

वेळ अशी, अशी वाट
डोळ्यांतील काजळाचें
गालावरी लाव बोट

११-८-५८

◎ ◎

६० राखणदार

गांवसीमेवर राखणदार
विशाल गड उभा पारावर

अलीकडे बसे मांडुनी ठाण
शंभर वर्षांची म्हातारी विहीर
पलीकडे आहे मोठ्या मारुतीचें
लहान मंदीर.

गांवांतील गोष्टी पाहून ऐकून
तट्ट फुगलें वडाचें पोट
हात रोविले भूमींत तरीही
त्याची मान ताठ !
माहीत त्याला याच गांवचा
दोन शतकांचा सर्व इतिहास

भूतकाळचा राखणदार
तोच जाणतो उद्यां काय या
गांवांत होणार

निशीथ समयीं
त्याच्या दुःखाला फुटते वाचा
म्हणतो, 'मला वाचतां येईना
लेख ललाटीचा !'

१५-८-५८

◎ ◎

६१ श्रावणझड

दारांत उभी
श्रावणझड ओलेती !
जाईचीं शुभ्र फुलें
घेउनि कोमल हातीं
उन्मादक मंद गंध
उधळित होउनि धुंद
ओठांवर दिव्य गीती
श्रावणझड ओलेती !

झाड उन्हाची दृष्ट
लागुं नये म्हणुन त्वरें
मोत्यांच्या मालिकांत
लपवित निज रजतकांति
श्रावणझड ओलेती !
दारांत उभी.

‘ उघड दार, उघड दार
रूपवती !
दृष्ट तुझी लागेल अशी
श्रावणझड ओलेती ! ’

२४-८-५८

◎ ◎

६२ साक्षात्कार

संध्याकाळीं देवघरीं
नीरांजनीं फुलवात
मंद प्रसन्न प्रकाश
उधळीते स्निग्ध ज्योत

धूप जळे कणकण
गंधांत होऊन धुंद
देवस्पर्शाला अधीर
शुभ्र फुलें तबकांत

हात जोडून चिंतनीं
नेत्रदळें मिटलेलीं
तुझ्या शांत मुखावर
उजळ कांती आगळी

मंगल या क्षणांतून
नित्य लक्ष्मीचें दर्शन !

७-९-५८

६३

# येइन म्हणतें

येइन म्हणतें तुझ्याकडे परि,
अंगणांतली मधु फुलवंती
हरितकरांचा घालुनि अडसर
मज विचारते, 'कुठें निघालिस
ऐन सकाळीं !'

येइन म्हणतें तुझ्याकडे परि,
वळणावरचा हिरवट पिंपळ
करीत सळसळ मज, विचारतो,
'कुठें निघालिस ऐन दुपारीं !'

येइन म्हणतें तुझ्याकडे परि,
वाटेवरल्या लोचट बेढब
लांब सांवल्या, मज विचारती
'कुठें निघालिस संध्याकाळीं !'

येइन म्हणतें तुझ्याकडे परि,
निळ्या महालाच्या खिडकींतुन
चंद्र बोलतो,
'कुठें निघालिस नीरव रात्रीं !
नकोस जाऊं अशी एकटी
तुझ्या मनीं फुलवीत चांदणें
येतों मी तुजसवें थांब ना !'

कसा धरूं त्याचा विश्वास !

१-१-५८

६४ दीपवात

चांदण्यांत न्हालेली मध्यरात्र
भिरभिरतो फुलवेडा मंदवात

दारिं उभा उन्मादक पारिजात
निद्रावश नीरवता अंगणांत

मंदिरांत जळत शांत बघत वाट
जागतसे कनककांति दीपवात !

११-९-५८

◎ ◎

६५

## किमया

डोळ्यांतील बाहुल्यांनीं
कसली किमया केली !
अनोळखी पावलांना
ओळखीची वाट झाली

ओळखीची वाट होते
चांदण्याची चंद्रकोर
अशोक झाडाला वाटे
व्हावें थोडें चित्तचोर

चित्तचोराच्या मनांत
नित्य चांदणें फुलतें
फुललेल्या चांदण्यांत
वाट अधांतरीं होते !

२०–९–५८

◎ ◎

६६ रिकाम्या रानीं

ज्या गांवांतिल आहे बाभळ
त्याच गांवची असते बोरी
घरोघरीं मातीची चूल
कुठें जुनी तर कोठें कोरी !

टाकीच्या घावाविण येथें
पाषाणाला ये देवकळा
नकटीच्या लग्नाला येतो
सतराशें विघ्नांचा मेळा

शितें तोंवरी भुतें बोलतीं
आज रोख अन् उद्यां उधार
कामापुरता मामा म्हणतो
भाच्याला नच अक्कल फार

सांगावें जर कुणास तर तो
म्हणतो खोटे दांत दाखवुन
जाऊं द्या हो, असावयाचीं
पळसाला नित पानें तीन

असे लंगडी गाय परंतु
वासरांमधें सदा शहाणी
अति शहाण्याचा बैल रिकामा
पाठीवर मोकळीच गोणी

चोराच्या मनिं फुलें चांदणें
दिव्याखालतीं परि अंधार
असे बळी जो कानपिळी अन्
होतो चोरावरती मोर

खडा टाकुनी बघतांना कुणि
खडे फोडुनी खडे चारतो
खाल्ल्या घरचे वासे मोजित
अडणीवरचा कोणी फिरतो

प्रेम पैठणी दाखवीत कुणि
ताकास्तव सांगे रामायण
आणि रिकाम्या रानीं फिरतो
अडून बसलेला नारायण !

२७-८-५८

◎ ◎

६७ 

# बकुळीची वाट तुझी

बकुळीची वाट तुझी
बाभळिच्या वाटेवर
येउं नको !
फिरणें तव चांदण्यांत
काळया घन अंधारीं
जाउं नको !

गंधित तव नंदनवन
गर्द देखण्या फुलांस
मोहुं नको !
उपवनिं तव पुष्करिणी
खोल आड डोकावुन
पाहुं नको !

पारख तुज रत्नांची
कांचेचा मणि पदरीं
बांधुं नको !
कांचनमृग पाहुनिया
वनवासी तूं सीता
होउं नको !

६-८-५९

◎ ◎

## ६८ दान दे

जें तुझें नाहीं तयाचें वेड तूं सोडून दे
जें तुझें आहे तुझें तूं त्यागुनी ' मी ' दान दे

रम्य पुष्पें वा फळें द्यावीं कुणाही सर्वदा
हीच आहे वृक्षवेलींच्या तपाची सांगता
चंदनाचें खोड तूं रे नित्य अन्यां गंध दे

प्रेमयात्री निर्झराच्या जीवनीं संजीवनी
चंद्रकांति स्पर्श होतां रात्र होते चांदणी
रे तुझ्या दानापुढें त्या थोर मेघा लाजुं दे

दीप तूं जे चालती अंधारिं त्यांना तेज दे
गांजलेल्या दीन हातीं तूं दयेचा हात दे
विश्वरूपीं रे तुझें तूं विश्व सामावून घे

१४-२-'५५

◎ ◎

६९

# समाधान

हातांतील पक्षी
हातांत असावा
झाडींतील दुजा
पाहिजेच

हातचें सोडोनी
पळत्याच्या पाठीं—
लागणें हेंच कीं
ब्रीद असे

हेंहि गेलें जरी
तेंहि गेलें तरी
धुपाटणें करीं
उरतेंच !

मानीत असावें
समाधान त्यांत
आपुलाच हात
जगन्नाथ !

१६-८-५९

© ©

## ७० हेमन्त

निवान्त, निवान्त नदीचा कांठ
निळें नभ न्हातें नितळ जलांत
मोकळें, मोकळें......

गर्द वावरांत
मोटेचें गीत, ऐकत ऐकत
भाशावलेली स्वर्णकांति लक्ष्मी
झोपलेली शान्त !

बघे अनिमिष,
कृतार्थ झालेला
श्रीकांत हेमन्त !

४-८-'२९

७१

## मराठी मनांत

स्वातंत्र्याचा मंत्र
मराठी मातींत
मंगल विभूती
प्रखर ज्वलंत

मराठी अन्नाचा
मराठा महान
रुंद छातीवरी
ताठर गर्दन

मराठी पाण्यांत
दिव्य भागीरथी
तिच्या संगतींत
वसे सरस्वती

यत्नदेव जागे
घरांत दारांत
सर्वांभूतीं प्रेम
मराठी मनांत

ज्ञानेशाच्या मुखीं
अमृतानें न्हाली
मृत्युंजय झाली
धन्य मायबोली

२५-३-६०

◎ ◎

७२

# रात्र अतां ढळलेली

चंद्र नभीं कललेला
रात्र अतां ढळलेली
मंदिरिं कर्पूरज्योत
कधिंच शांत झालेली

मदिर गंधिं धुंदावुन
गात्रें जरि थकलेलीं
मिटलेल्या पापण्यांत
स्वप्नफुलें फुललेलीं

वृक्षांना बिलगुनिया
निद्रावश फुलवेली
झुळुक एकटी अजुनी
बसली संकेतस्थळीं

७-८-५९

◎ ◎

७३

# स्मृति

विश्वामित्राच्या तपाचें
पुण्य लाभे दुष्यंताला
बहरलेल्या वेलींचा
गहिंवर वाया गेला

साचिंत प्रियंवदेला
आतां आठवती बोल
' रुतणाऱ्या वल्कलाची
सखे, गांठ कर सैल '

अनसुयेच्या डोळयांत
कमलपत्रांची नक्षी
कण्वांच्याहि करांतुनी
सुटला शकुंतपक्षी !

◎ ◎

१५-८-५९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 92072
REFBK-0012712
REFBK-0012712
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38785 वि: कविता
क्रमांक 1589 नों दि 20-12-62

७४

## मेघदूत

आषाढाच्या पहिल्या दिवशीं
मत्त गजासम मेघ नभांत
धीट विजेच्या घट्ट मिठींतुन
निसटुनि धावे होउनि श्रांत

अलकावतिच्या उद्यानांत
कुण्या मदालस कलावतीचा
मोर नाचतो थयथय फुलवुन
भव्य पिसारा शतरंगांचा

संगमरवरी सौधावरतीं
यक्ष बिचारा एक अपाप
मेघ पाहुनी नभांत, म्हणतो
‘ पुन्हां मिळावा कुबेर-शाप ’

३–७–६०

◎ ◎

७५

## उघड दार, उघड दार

नभनयनीं नीलांजन
शीतलतनु मन्दानिल
विकसित नवकमलिनिदल
चेतोहर मधु परिमल
सुमसंडित कुंज कुंज
दवसिंचित हिरवें तृण
कांचन तेजांत सिक्त
हर्षित वन अन् तन मन
उघड दार, उघड दार
ये छेडित तव सतार
शरद सुखद संगतींत
गाऊं आनंदगीत

२५–१०–६१

◎ ◎

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
क्रम 34185 दि: ...
9529